# जिल्हा परिषद, पालघर

## ग्रामपंचायत विभाग

जा.क्र.पाजिप/ग्रापं/आस्था-२/ १८१ /१६.　　　　　　　　　　　　दि. ०२/०९/२०१६

प्रति,

गट विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती, ---------(सर्व)

विषय :- ठाणे/पालघर जिल्हयात जि.प. कर्मचारी समायोजनासाठी विकल्पाच्या यादया प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- १. ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एपिटि-०१६/प्र.क्र.४५/आस्था-८, दि. २२.०७.२०१६
२. या कार्यालयाचे पत्र क्र. ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/६३०/१६, दि. २६.०७.२०१६
३. या कार्यालयाचे पत्र क्र. ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/६३४/१६, दि. २८.०७.२०१६
४. कार्यालयीन पत्र क्र. ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/६३५/१६, दि. २८.०७.२०१६
५. मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्र क्र. विकास/कार्या-२/सेभ/प्र.क्र.-४९३६/२०१६/११२०, दि.२०.०८.२०१६ व शविवृत्त दि. ३०.०८.२०१६
६. जिल्हा परिषद, ठाणे ग्रा.पं. विभागाकडील पत्र क्र. ठाजिप/ ग्राप/आस्था-२-/७०५/१६, दि.०१/०९/२०१६

उपरोक्त संदर्भान्वये कळविणेत येते की, संदर्भ १ अन्वये दि. २२ जूलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे समायोजन प्रस्तावित आहे. त्याबाबत संदर्भीय शासन निर्णयातील निकष व विकल्पानुसार यादया तयार करुन या कार्यालयास सादर करणे बाबत कळविणेत आहे होते. संदर्भ ३ अन्वये उक्त शासन निर्णायतील निकषानुसार प्राधान्यक्रमाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ते पुराव्यासहीत माहिती या कार्यालयास दि. ३०/०७/२०१६ पर्यंत सादर करणे बाबत स्थानिक व दैनिक वृत्तपत्रातून प्रेसनोट व्दारे आव्हान करण्यात आले होते.

त्या अनुषगांने प्राप्त झालेली माहितीचे संकलन करुन सेवाजेष्ठतेनुसार व प्राधान्य क्रमाप्रमाणे मंजूर आकृतीबंधानुसार पदनिश्चिती करणे बाबत संदर्भ ५ अन्वये दि. २२/०८/२०१६ रोजी समन्वय समिती बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार समायोजन प्रक्रिया संबंधिची कर्मचाऱ्यांनी दिलेल्या विकल्पानुसार व शासन निकषातील प्राधान्य क्रमाबाबत समायोजनाच्या यादया विभागीय/तालुका स्तरावर प्रसिध्द करुन सर्व कर्मचारी संघटनांच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यापर्यंत पोहचवावी. यादी प्रसिध्द करताना कोणताही कर्मचारी वंचीत राहणार नाही व याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सवर्गनिहाय समायोजन विकल्पाच्या यादया खालील प्रमाणे सोबत जोडल्या आहेत.

| अ.क्र | संवर्गाचे नांव | यादितील पृष्ठ क्रं. १ ते पर्यंत |
|---|---|---|
| १. | विस्तार अधिकारी (पंचायत/एसजीएसवाय) | सेवाजेष्ठतेनुसार १ ते ३<br>प्राधान्यक्रमानुसार १ ते ३ |
| २. | ग्रामविकास अधिकारी | सेवाजेष्ठतेनुसार १ ते १७<br>प्राधान्यक्रमानुसार १ ते १७ |
| ३. | ग्रामसेवक | सेवाजेष्ठतेनुसार १ ते ४३<br>प्राधान्यक्रमानुसार १ ते ३३ |

वरील प्रमाणे विकल्प यादीतील माहितीत विसंगती अथवा प्राधान्यक्रमाबाबत हरकत असल्यास ५ दिवसात कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणेत यावीत. व त्यानुसार समायोजनाची अंतिम यादी तयार करुन पदनिश्चितीनुसार समायोजनाची कार्यवाही पुर्ण करणेत येईल. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर